# भारतीय अर्थव्यवस्था विकासातील लोकशाहीची भूमिका

**डॉ अवधूत भाऊपाटील नवले**, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत. ई मेल : nawaleavadhut@gmail.com

---

**प्रस्तावना**

भारतात लोकशाही राज्यपद्धतीस सुरुवात 26 जानेवारी 1950 रोजी झाली. लोकशाही मूल्यांचा स्वीकार करून जनहिताची कामे केली जातात. लोकशाहीमध्ये सर्वसमावेशक सामाजिक आणि आर्थिक बाबींचा विचार केला जातो. आरोग्य, गुलामगिरीची मानसिकता, निरक्षरता, तंत्रज्ञानाचा अभाव, इत्यादी अनेक आव्हानांवर मात करत भारतीय लोकशाही विकसित होत गेली. सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी लोकशाहीचा वापर केला जातो. भारतीय लोकशाहीने जाणीवपूर्वक मिश्र अर्थव्यवस्था याबविण्याची मागणी केली. या धोरणानुसार देशांतर्गत व देशाबाहेरील राजकीय,सामाजिक आणि आर्थिक संकटांच्या पार्शभूमीवर १९५० ते १९९० दरम्यान देश स्वावलंबनाच्या मार्गावर पुढे नेण्यात आला.अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास 1991 पूर्वीची लोकशाही आणि त्यानंतरची लोकशाही असे भारतीय लोकशाहीचे दोन कालखंडात विभाजन करता येऊ शकते. 1991 पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था ही बंदिस्त स्वरूपाची होती. अनेक आर्थिक प्रश्न हे भारतीय समाजाला भेडसावत होते. अनेक संसाधनंबाबत भारतीय जनता झगडत होती. उदा. संसाधनांची टंचाई. 1991 औद्योगिक धोरण स्वीकारण्यामागे भारताची परकीय गंगाजळी नकारात्मक होती, त्यामुळे खाजगीकरण, उदारीकरण जागतिकीकरण धोरण स्वीकारून भारतीय अर्थव्यवस्थेला उभारी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यात आल्यामुळे अनेक विदेशी कंपन्यांनी भारतात व्यवसाय सुरू केला. भारतात मोठ्या प्रमाणावर विदेशी वस्तूंची आयात सुरू झाली. वस्तू व सेवा स्वस्तात उपलब्ध होऊ लागल्या. उपलब्ध संसाधनांचा पुरेपूर वापर केल्यामुळे देशीची आर्थिक परिस्थिती सुधारली. या सर्व सकारात्मक बाबींचा विचार आपण केलं तरी काही नकारात्मक बाबीमुळे लोकशाहीची काही मूल्ये मागे पडत गेली. उदा. आर्थिक समानता मोठ्या प्रमाणावर उद्योग व्यापार व्यवसाय यांची वाढ होत गेली. भांडवलदार निर्माण होत गेले, यातून गरीब-श्रीमंत दरी वाढत गेली. गरिबांची आर्थिक परवड होऊ लागली. परिणामतः 1991 च्या धोरणामुळे आर्थिक वाद शिल्लक राहिला. समाजवाद-राष्ट्रवाद मागे पडत गेला. आर्थिक विषमता ही अर्थरचनेतून येत नाही तर ती आर्थिक धोरणातून येत असते हे लक्षात आले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी अनेक सरकारांनी विविध मार्गांनी प्रयत्न केले आहेत. उदा. परकीय गुंतवणूक, खाजगी गुंतवणूक, इत्यादी प्रकारचे धोरणं आखली गेली गुंतवणुकीवरील परतावा म्हणजे नफा होय. गुंतवणूकदार हा नेहमी नफा कसा मिळेल याचा विचार करत असतो. 1991 नंतर भारतात गुंतवणूक वाढली आणि जनतेचे शोषण होत गेले म्हणजेच गुंतवणूक आणि या दोघांचा सहसंबंध आहे असे समजते.

**लोकशाहीची अर्थव्यवस्था विकासातील भूमिका:**

**१. संसाधनांची संतुलित वितरण**

स्वातंत्र्यानंतर भारतात लोकशाही मूल्यांचा स्वीकार केल्यामुळे उपलब्ध संसाधनांवर एक समान हक्क प्राप्त झाला. समाजातील अविकसित घटकांना विकासाची संधी उपलब्ध झाली परिणामी अर्थव्यवस्थेला गती मिळाली. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या कमी होण्यास मदत झाली. संपत्ती व संसाधानाचे केंद्रीकरण होणार नाही व आर्थिक समानता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट लोकशाहीचे आर्थिक विकासात आहे.

**२. व्यवसायाची उदारीकरण**

कोणत्याही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेने दिल्यामुळे वंश, जात, धर्म, स्त्री- पुरुष, शहरी-ग्रामीण असे ब्रीद लोकशाहीने अमान्य केले. उद्योग व्यवसायांची संख्या वेगाने वाढले अर्थव्यवस्थेला गती प्राप्त झाली.

**३. राष्ट्रीय उत्पन्नाचे समन्याय्य वाटप**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर आखण्यात येणाऱ्या प्रत्येक धोरणांमध्ये उपलब्ध असणारे संसाधने, सवलती, परवाने देणे, एकूण राष्ट्रीय उत्पन्न यांचे सामाजिक आर्थिक आणि भौगोलिक स्तरावर समन्याय वाटप कसे होईल याकडे लक्ष पुरवण्यात आले.

**४. सामाजिक सहभागावर भर**

अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्रिया उपक्रियांमध्ये समाजातील प्रत्येक घटकांचा कसा सहभाग वाढत जाईल याकडे प्रकर्षाने लक्ष देण्यात आले.

**५. रोजगार निर्मितीत वाढ**

रोजगार मिळवण्याचा हक्क भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला प्राप्त झाल्यामुळे नोकरी कामधंदा, उद्योग-व्यवसाय करण्याचा मुभा भारतातील कोणत्याही प्रदेशातील व्यक्तीस प्राप्त झाला, परिणामी रोजगारात वाढ झाली.

**६. सामाजिक स्वास्थ्यात वाढ**

रोजगाराची उपलब्धता, अधिकारांचे समन्याय्य वाटप इत्यादी कारणांमुळे भारतातील अनेक समाज गतिशील बनले. उद्योग व्यवसाय करू लागले यातून प्रत्येकाच्या हातात पैसा आल्यामुळे क्रयशक्ती वाढली, गरजांची पूर्तता होऊ लागली. परिणाम स्वरूप गुन्हेगारी, व्यसनाधीनता, नैतिक अधःपतन या अपप्रवृत्तींवर नियंत्रण आले.

**७. संतुलित प्रादेशिक विकास**

विकासाचा हक्क प्रत्येक व्यक्तीस भारतीय लोकशाहीने प्राप्त करून दिल्यामुळे अनेक उद्योगांनी देशातील विविध भागात आपला व्यवसाय विस्तार केला. उद्योगांची देशातील कानाकोपऱ्यात स्थापना होऊ लागली. उद्योजकतेला पूरक असे वातावरण उपलब्ध करून देण्यात आले. दुर्गम भागात व्यवसायाची स्थापना होऊन प्रादेशिक संतुलित विकासात वाढ झाली.

**समारोप**

सामाजिक व आर्थिक तफावत कमी करण्याच्या दृष्टीकोनातून आर्थिक लोकाशाची गरज आहे. समाजाच्या उन्नतीसाठी लोकशाहीच्या मूल्यांचा वापर झाला पाहिजे हा उद्देश भारतीय लोकशाहीचा आहे. परंतु जनप्रतिनिधी भारतीय लोकशाहीचा निवडणुकीसाठी वापर व्युवरचना म्हणून वापर करताना दिसतात. मूल्य विरहित लोकशाही राज्य पद्धतीमुळे समाजाच्या आर्थिक विकास अडसर निर्माण होतो, हे जरी खरे असले तरी दीर्घकाळात लोकशाहीची मूल्ये दृढ होतील. भारतीय अर्थव्यवस्थ्रेच्या विकासात लोकशाहीचे अतुलनीय योगदान आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची**

१.अकोलकर ग.वि.,(१९७३) समाज संस्कृती आणि शिक्षण, विद्या प्रकाशन, नागपूर
२.डॉ. बोबडे प्रकाश,(१९९४) भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, मंगेश प्रकाशन
३. मानसी क्षीरसागर, (२०२०) आर्थिक लोकशाहीची गरज, महाराष्ट्र टाईम्स
४. विश्वास उटगी, उदारीकरणाची ३०वर्षे, बी बी सी न्यूज मराठी